# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ९७ वा मंगळवार दि.१७ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## ॲड.झंवर यांचा पाईक म्हणून लातूरच्या ग्रंथालय चळवळीचे पालकत्व घेवून मुक्तेश्वरांच्या साक्षीने ग्रंथालयांचे प्रश्न प्रामाणिकपणे मार्गी लावणार

औसा :– ॲड.त्र्यंबकदास झंवर या गुणी माणसाने राज्याच्या ग्रंथालय चळवळीत लातूरचा दबदबा निर्माण केला.त्यांचा एक पाईक,औशाचा नागरिक म्हणून लातूरच्या ग्रंथालय चळवळीचे पालकत्व स्विकारुन,राज्यातील ग्रंथालयांना ४० टक्के वाढीव अनुदान,दर्जाबदल,नवीन ग्रंथालयांना शासन मान्यता व ग्रंथालयाचे इतर प्रश्न, निवडणुकीची आचार संहिता लागण्यापूर्वी,मार्गी लागण्यासाठी ग्रामदैवत श्री मुक्तेश्वरांच्या साक्षीने प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याची ग्वाही औसाचे आ.अभिमन्यु पवार यांनी दिली.

लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाने गेल्या महिन्यात आ.अभिमन्यु पवार यांची भेट घेवून २०१२ पासून राज्यातील ग्रंथालयाच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्याचे साकडे घातले होते,त्यावर आ.पवार यांनी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत सर्व संबंधितांची अवघ्या १५ दिवसात म्हणजे २९ ऑगस्टला बैठक आयोजित करुन,त्यात ग्रंथालयांचे ४० टक्के उर्वरित अनुदानवाढ,दर्जाबदल,नवीन ग्रंथालयांना मान्यता आदींबाबत चर्चा घडवून आणून तो मार्गी लावण्यासाठी मोलाचा वाटा उचलला,त्याबद्दल लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाच्यावतीने आ.अभिमन्यु पवार यांचा सोमवार,दि.१६ सप्टेंबर २०२४ रोजी औसा येथील श्री मुक्तेश्वर मंगल कार्यालयात सत्कार सभारंभ आयोजिला होता,त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

या समारंभाच्या अध्यक्षपदी जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे हे होते.मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले होते.मंचावर कै.रामदास नायक सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष ॲड.मुक्तेश्वर वागदरे,भाजपा तालुकाध्यक्ष सुभाष जाधव,धनंजय कापरे, गंगाभीषण भंडारी,ग्रंथमित्र हावगीराव बेरकीळे,सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष राम मोतीपवळे,उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव,कालिदास माने यांची उपस्थिती होती.





आमदार म्हणून जात,धर्म,पक्ष न पाहता मी लोकांची कामे करत असतो,करत राहणार असे स्पष्ट करुन मला वाचनाची प्रचंड आवड होती,लातूरच्या बचत ग्रंथालयातून दर्जेदार ग्रंथांचे वाचन केले,ग्रंथालय हे ज्ञानाचे मंदिर आहे,तिथे सरस्वतीची पूजा,आराधना होते,आज पुस्तक वाचन कमी होत असले तरी नवीन वाचक तयार करुन,वाचन संस्कृती टिकवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत,वर्गणीदार वाढवावेत,ग्रंथ वाचन हा जीवनाचा अविभाज्य भाग बनावा,पुस्तक वाचून जे ज्ञान मिळते,आकलन होते,व्याकरण समजते ते मोबाईलमध्ये पाहून,कानातून हेडङ्गोन टाकून ते साध्य होत नाही असे सांगून,मी ग्रंथालयांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबध्द आहे,तुम्ही जिल्ह्यातील ग्रंथालय चालक,कर्मचार्यांनी येणार्या विधानसभा निवडणुकीत माझ्या पाठीशी ताकद उभी करावी असे आवाहन शेवटी केले.

मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले यांनी २०१२ नंतर राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रश्न मार्गी लागण्यासाठी आ.अभिमन्यु पवार यांनी दाखविलेली तत्परता मरगलेल्या ग्रंथालय चळवळीला उर्जितावस्था आणून देणारी आहे,त्याचा अत्यानंद असून,त्यांनी ग्रंथालय चळवळीचे पालकत्व घ्यावे,ग्रंथालयाचे प्रश्न सुटण्यासाठी उप्रमुख्यमंत्री देवेंद्र ङ्गडणवीस व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे आग्रह धरुन आचारसंहितेपूर्वी जीआर काढला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली. ॲड.मुक्तेश्वर वागदरे यांनीही सार्वजनिक ग्रंथालयाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करुन आ.पवार यांनी न्याय द्यावी अशी विनंती यावेळी केली. अध्यक्षीय समारोपात प्रभाकर कापसे यांनी आ.पवार यांच्यामुळे ग्रंथालयाचे प्रश्न मार्गी लावण्यात मिळालेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी आ.पवार यांचा अनेक ग्रंथालय चालकांनीही शाल,बुके,पुष्पहार,ग्रंथभेट देवून सत्कार केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथमित्र हावगीराव बेरकीळे यांनी केले.सूत्रसंचालन पी.सी.पाटील यांनी केले.या कार्यक्रमासाठी सूर्यकांत जाधव,गिरीधर जंगाले,बाळू वैजवाडे,विकास चिरके,प्रा. एन.जी.माळी,चंद्रशेखर पारुडकर,ग्रंथमित्र संतोष करमले आदिंनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाला जिल्हातील ग्रंथालय चालक,ग्रंथपाल,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हा रेल्वे बोगी नव्हे बोगस कारखाना

### आमदार देशमुख यांची टीका, लातूर ग्रामीणमधील औसा तालुक्यातील गावांत संवाद

> पश्चिमवाहिनी नद्यांचे वाहून जाणाऱ्या पाण्यासाठी वळण योजना आणल्या तरच मराठवाड्यातील सिंचन क्षेत्र वाढेल व त्यासोबत उदयोग व रोजगार येतील. बुलेट ट्रेन, समृद्धी महामार्ग, शक्तीपीठ महामार्गासाठी सरकारकडे पैसा आहे. मात्र, शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाच्या सुविधा देण्यासाठी पैसा नाही. लातूर जिल्हा बँकेने हार्वेस्टरच्या माध्यमातून उद्योजक निर्माण केले आहेत. त्या धर्तीवर सोयाबीन काढणी यंत्राच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीसाठी कर्ज देण्याचा बँकेचा विचार आहे. महिला बचत गटांसाठी जिल्हा बँक पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज देते. बँकेच्या या योजनांचा लाभ घ्यावा.
> – आमदार धिरज विलासराव देशमुख.

लातूर/प्रतिनिधी :– स्थानिक बेरोजगारांना मोठ्या संख्येने रोजगार देण्याचे गाजर दाखवून रेल्वे बोगी कारखाना उभारण्यात आला. त्याचे एकदा नव्हे चारवेळा उदघाटन करण्यात आले. मात्र, कारखान्यातून ना बोगी बाहेर पडली किंवा रोजगाराची उपलब्धता झाली. त्यामुळे हा बोगी कारखाना आहे, की बोगस कारखाना आहे, हे कळत नाही. याबद्दल लोकांनीच आता सत्ताधाऱ्यांना जाब विचारावा लागेल, अशी टीका लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केली. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील समदर्गा व कोरंगळा (ता. औसा) येथे आमदार देशमुख यांनी शुक्रवारी (दि. १४) ग्रामस्थांशी संवाद साधला. या वेळी ते बोलत होते. खोटे आश्वासन देऊन सत्तेवर आलेल्या महायुती सरकारच्या धोरणाला शेतकरी, महिला व तरुण वैतागले आहेत. भाव वाढणार म्हणून सोयाबीनची थप्पी घरी किती दिवस ठेवायची. जाहिरातबाजीच्या माध्यमातून केवळ विकासाचे चित्र रंगवायचे सरकारचे धोरण आहे. जनतेच्या पैशातून जाहिरातीसाठी पगारी योजना दूत नेमले जात आहेत. राज्यात व केंद्रात भाजपचे सरकार असताना शेतीमालाला भाव नाहीत, रोजगार नाही, नोकरभरती नाही, महागाई वाढली आहे, जीएसटीतून पिळवणूक केली जाते, महिला सुरक्षित नाहीत. याबद्दल येणाऱ्या निवडणूकीत सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारला पाहिजे. पंधराशे व दोन हजारांचे आमिष दाखवून बोळवण केली जात आहे. तात्पुरता विचार न करता भविष्याचा विचार करून आपल्या हक्कासाठी व शाश्वत रोजगारासाठी सजग राहून हित जोपसणारे सरकार निवडले पाहिजे, असे आमदार देशमुख म्हणाले. कोरंगळा येथील जिल्हा परिषद शाळांतील नवीन सात वर्गखोल्या बांधकामासाठी पाठपुरावा केला. यामुळे ६१.५० लाखाचा निधी मंजूर झाला. विविध योजनांच्या माध्यमातून गावाच्या विकासकामात योगदान देता आले, याचे समाधान आहे. ग्रामस्थांनी केलेल्या मागणीनुसार संविधान सभागृह, समाज मंदीर संरक्षक भिंत, रस्त्यांची दुरुस्ती आदी कामे तातडीने पूर्ण करू, अशी ग्वाही आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी दिली. समदर्गा येथे महिलांसाठी सभागृह, हनुमान मंदीर येथील सभामंडपाच्या दुरुस्तीचे काम करू, असेही यावेळी त्यांनी आश्वस्त केले.



या वेळी सचिन दाताळ, अनुप शेळके, सदाशिव कदम, महेंद भादेकर, चौधरी, रघुनाथ शिंदे, शिवप्रसाद शिंदे, मधुकर कदम, मधुकर शिंदे, जगन्नाथ ढोक, भागवत गरगडे, जालींदर ढोक, राजेंद्र शिखरे, सहदेव जंगाले, ज्ञानदेव जंगाले, तुराब शेख, नवनाथ पवार, सतीश भिसे, युवराज ढोक, सुग्रीव पाटील, संजय ढोक, किरण ढोक, नवनाथ कसबे, सुमीत कसबे, गोविंद ढोक, गणेश ढोक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## मोदींचे मानसिक संतुलन बिघडल्यासारखे वाटते

मुंबई : प्रतिनिधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जमशेदपूरच्या दौ–यावर असताना झारखंडमधील 'लाडकी बहीण' योजनेवर टीका केली. ही योजना बोगस असल्याचे विधान पंतप्रधानांनी केले होते. त्यांच्या या विधानावर आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे की काय अशी टीका केली आहे.



दरम्यान, खासदार संजय राऊत यांनी सोमवारी (ता. १६ सप्टेंबर) प्रसार माध्यमांशी त्यांनी संवाद साधला. याचवेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. प्रसार माध्यमांसमोर खासदार संजय राऊत म्हणाले की, मला पंतप्रधान पदाबाबत आदर आहे. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी आता काय बोलतील हे माहीत नाही. त्यांचे मानसिक संतुलन कळत नाही. त्यांचे मन सडलेले आहे.

झारखंडमध्ये जर कोणतीही योजना चुकीची असेल तर महाराष्ट्रात ते कसे योग्य आहे? मोदी दोन राज्यांमध्ये दुजाभाव करतात. पंतप्रधान झारखंडमधील लाडक्या बहीण योजनेला बोगस, भंपक बोलतात. पण दुस–या राज्यातील लोक लाडकी बहीण योजना काढतात तेव्हा त्यांना बोगस म्हणतात. झारखंड सरकारने ही योजना काढली तर त्याला पंतप्रधान मोदींनी बोगस म्हटले. पण सगळ्यात जास्त बोगस योजना तर महाराष्ट्रात सुरू आहेत, अशी टीका राऊतांनी केली आहे.

यावेळी खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीत मिळालेल्या बंगल्यावरून भाष्य करत म्हटले की, देवेंद्र फडणवीस जातात तिकडे त्यांना बंगला मिळत आहे. त्यांचे आणि बंगल्याचे काय रहस्य आहे हे मला कळलेले नाही. महाराष्ट्रात मंत्री आणि मुख्यमंत्र्यांना एकच बंगला मिळतो. इथे तर त्यांनी तीन तीन बंगले घेतले आहेत. मुख्यमंत्र्यांनी तीन बंगले घेतलेत. दिल्लीत बंगला वाटप सुरू आहे. पण त्याचा एकदा 'भूत बंगला' होणार आहे. एवढे बंगले घेतले आहेत. निवडणूक हरल्यावर सर्व भुतासारखे फिरणार आहेत. मला कळत नाही यांना एवढे बंगले का देत आहेत? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे.


मराठवाडा मुक्ती संग्रामदिनानिमित्त

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई

जिल्हा शाखा लातूर आयोजित

महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा

आपणास कळविण्यास आनंद होतो की, प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवर व्यक्तींना महाराष्ट्र भूषण पुरस्कार – २०२४ देऊन खालील मान्यवरांच्या हस्ते सन्माणित करण्यात येणार आहे.

शुभहस्ते: ह.भ.प.गहिनीनाथ महाराज (कार्याध्यक्ष–पंढरपूर देवस्थान)

कार्यक्रमाचे अध्यक्ष: मा.संजय भोकरे (संस्थापक अध्यक्ष, पत्रकार संघ)

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे

मा.दिलीपराव देशमुख (माजी मंत्री)
मा.आ.अमित देशमुख (माजी मंत्री)
मा.खा.शिवाजी काळगे (लातूर लोकसभा मतदार संघ)
मा.आ.रमेशअप्पा कराड (सदस्य–विधान परिषद)
मा.अशोक वानखेडे (राष्ट्रीय अध्यक्ष पत्रकार संघ, दिल्ली)
मा. वसंत मुंडे (प्रदेशाध्यक्ष, पत्रकार संघ)
मा. वर्षा ठाकूर-घुगे (जिल्हाधिकारी लातूर)
मा. सोमय मुंडे (पोलीस अधिक्षक, लातूर)
मा. बाबासाहेब मनोहरे (आयुक्त,मनपा लातूर)
मा. सिद्धार्थ भोकरे (प्रदेशाध्यक्ष, डिजीटल मिडीया)
मा. डॉ. विश्वास आरोटे (राज्य सरचिटणीस पत्रकार संघ)
मा.वैभव स्वामी (मराठवाडा अध्यक्ष पत्रकार संघ)

तरी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

आपले विनीत

अशोक देडे – जिल्हाध्यक्ष
अफसर कारभारी – कार्याध्यक्ष
अशोक हणवते – जिल्हा सचिव
सुधाकर फुले – जिल्हा संघटक
महादेव डोंबे – शहराध्यक्ष
नितीन बनसोडे – इले. जिल्हा प्रमुख
हरूण मोमीन – इले. शहर प्रमुख
अरूण कांबळे – इले. शहर प्रमुख
लिंबराज पन्हाळकर – जिल्हा उपाध्यक्ष
श्रीधर स्वामी – जिल्हा उपाध्यक्ष
खय्युम शेख – जिल्हा सहसचिव
अमोल इंगळे – जिल्हा सहसचिव

मंगळवार, दि.१७ सप्टेंबर २०२४ दु.१२.३० वा. स्थळ : दयानंद सभागृह, लातूर

# संपादकीय....

## राजकीय पक्षांना कार्यालयाचे राजकारण

संसद भवनात कार्यालय असावे, अशी प्रत्येक राजकीय पक्षाची इच्छा असते. राजकीय पक्षांचे सदस्य निवडणुका जिंकून संसदेत पोहोचतात. त्यानंतर राजकीय पक्ष संसद भवनात स्वत:साठी कार्यालय शोधू लागतात. आता कार्यालय देताना मोठ्या पक्षांचाच विचार केला जातो; पण छोट्या पक्षांना कार्यालय देताना त्या पक्षांकडून किती राजकीय फायदा होतो, याचा विचार लोकसभा अध्यक्ष करताना दिसतात. राजकीय पक्ष कार्यकर्त्यांना संसद भवनाच्या कार्यालयात भेटायला बोलावून परिसरात संदेश देण्याचेही काम करतात. त्यांना या संदेशाचा राजकीय फायदाही होतो. संख्याबळाचा विचार करता मोठ्या राजकीय पक्षांना पक्ष कार्यालयासाठी खोली वाटपात कोणतीही अडचण येत नाही; पण संख्यात्मकदृष्ट्या छोट्या राजकीय पक्षांना कार्यालयीन खोल्यांचे वाटप होण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. त्यांना पूर्णपणे लोकसभा अध्यक्षांवर अवलंबून राहावे लागते. लोकसभा अध्यक्षांची इच्छा असेल, तरच अशा पक्षांना खोली मिळू शकते. नवीन संसद भवन बांधूनही बहुतेक राजकीय पक्षांना जुन्या संसद भवनात एक खोली मिळावी, अशी इच्छा आहे, ज्याला आता संविधान भवन म्हणून ओळखले जाते. ज्या राजकीय पक्षांच्या खासदारांची संख्या २० पेक्षा जास्त आहे, त्यांनाच संविधान सदनाच्या तळमजल्यावर खोली मिळू शकते. २० पेक्षा कमी खासदार असलेल्या राजकीय पक्षांना या इमारतीच्या तिसर्या मजल्यावर खोल्या देण्यात आल्या आहेत. संसद भवनातील खोल्यांची संख्या निश्चित आहे, त्यामध्ये राजकीय पक्षांना खोलीचे वाटप करावे लागते. लोकसभा सचिवालयासाठी ही मोठी डोकेदुखी आहे. स्वातंत्र्यानंतर संसद भवनात काही मोजके राजकीय पक्ष असताना खोली उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण नव्हती; पण जसजसा काळ वाढत गेला, तसतशी राजकीय पक्षांची संख्या वाढत गेली. अशा स्थितीत खोल्यांचे प्रश्न निर्माण होऊ लागले. ही परिस्थिती पाहता खोल्या वाटपासाठी काही मानके तयार करण्यात आली. ही मानके त्यांच्या सदस्यांच्या संख्येच्या प्रमाणात ठरविली; पण यासाठी कोणताही औपचारिक नियम किंवा कायदा नाही. पण, लोकसभा सचिवालयाने एक मानक तयार केला आहे. यानुसार, किमान ८ खासदार असलेल्या राजकीय पक्षांना खोल्या दिल्या जातील. असे असले तरी हे लिखित मानक नाही. लोकसभा अध्यक्षांची इच्छा असल्यास ते कमी संख्या असलेल्या राजकीय पक्षांना खोल्या वाटण्याची परवानगी देऊ शकतात. लोकसभा अध्यक्षांनी काही वेळा असे केले आहे. याची उदाहरणे १७ व्या लोकसभेत पाहायला मिळाली. यामध्ये अकाली दल, लोक जनशक्ती पक्ष या पक्षांना त्यांची संख्या कमी असतानाही कार्यालयीन खोल्या देण्यात आल्या. कौल आणि शकधर यांनी लिहिलेले पुस्तक संसदेची कार्यपद्धती चालवण्यासाठी आधारभूत मानले जाते. यानुसार पाचव्या लोकसभेपर्यंत काँग्रेस पक्ष सत्तेत राहिला. या पक्षासाठी संसद भवनात कार्यालयासाठी सर्व सोयींनीयुक्त दोन खोल्या होत्या (ज्याला आता संविधान सदन म्हणतात), तर विरोधी पक्षाकडे सेंट्रल हॉलच्या लॉबीमध्ये सुसज्ज खोली आणि काही विश्रामगृहे होती; पण सहाव्या लोकसभेत जनता पक्ष २९५ जागांसह सत्तेत आला. या लोकसभेत काँग्रेसचे १५४ खासदार होते. याशिवाय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे २२, एआयडीएमकेचे १८, अकाली दलाचे ९, कम्युनिस्ट पक्षाचे ७, शेतकरी आणि कामगार पक्षाचे ५, रिव्होल्युशनरी सोशालिस्ट पार्टीचे ४, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकचे ३, केरळ काँग्रेस, इंडियन युनियन मुस्लिम लीग, जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स आणि द्रमुकचे प्रत्येकी २ खासदार, झारखंड आणि महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे प्रत्येकी एक खासदार होते. याशिवाय ९ अपक्ष खासदार होते. सहाव्या लोकसभेत राजकीय पक्षांच्या कार्यालयांसाठी चार सुसज्ज खोल्यांची व्यवस्था केली होती. यामध्ये एक सत्ताधारी पक्ष जनता पक्षासाठी, तर एक प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस पक्षासाठी होती. एक खोली मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला आणि एक खोली अण्णाद्रमुक पक्षाला दिली. सातव्या लोकसभेत काँग्रेस पुन्हा सत्तेत आल्यावर त्यांना संसद भवनातील पक्ष कार्यालयात ४ खोल्या दिल्या. उर्वरित पक्षांना त्यांच्या संख्येनुसार प्रत्येकी एक–एक खोल्या दिल्या. त्यावेळी संख्याबळ ठरविण्याचे प्रमाण ८ सदस्य ठेवले होते. हे ८ सदस्य दोन्ही सभागृहांतील किंवा एकाच सभागृहातील असू शकतात; पण खोल्या वाटपासाठी किमान ८ खासदार असणे आवश्यक होते. आठव्या लोकसभेपासून सतराव्या लोकसभेपर्यंत ही परंपरा कायम होती. सध्याच्या अठराव्या लोकसभेतही त्याच परंपरेनुसार पक्ष कार्यालयासाठी खोल्या दिल्या जात आहेत. अकराव्या लोकसभेत समाजवादी पक्ष (सोशालिस्ट) आणि राष्ट्रीय जनता दल यांच्यात फूट पडली होती. या विभाजनानंतर समता पक्ष आणि जनता पक्षाची स्थापना झाली; पण या पक्षांना त्यावेळी संसदेत खोल्या दिल्या नाहीत, कारण लोकसभा अध्यक्षांनी या दोन नव्या पक्षांना संसदेत स्वतंत्र गट म्हणून मान्यता दिली नव्हती. त्यामुळे त्यांना स्वतंत्र खोल्या दिल्या नव्हत्या. १७ व्या लोकसभेतही जेव्हा शिवसेनेचे दोन गट पडले, तेव्हा त्यांना संसद भवनात स्वतंत्र खोल्या दिल्या नाहीत. तीच अवस्था राष्ट्रवादीची झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जेव्हा फुटला, तेव्हाही राष्ट्रवादीचे संसदेतील जुनेच कार्यालय 'जैसे थे' राहिले. त्यांना स्वतंत्र खोल्याही दिल्या नाहीत. १८ व्या लोकसभेत संसदेतील कार्यालयांसाठी खोल्या वाटपाची प्रक्रिया सुरू झाली आहे. शिवसेनेच्या दोन्ही गटांना स्वतंत्र खोल्या मिळाल्या आहेत, तर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला कार्यालयासाठी खोली दिली आहे; पण राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला जागा मिळालेली नाही. त्यामागचे कारण ८ सदस्यांच्या खोली वाटपाचे मानक असल्याचे सांगितले जाते.

# शासनयंत्रणेचा ताबा घेणे हे कामगारांचे ध्येय असावे_ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आपण सध्या २०२४ च्या सप्टेंबर महिन्यातील द्वितीय पंधरवड्यात अवलोकन करीत असताना या महिन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या अनुषंगाने नेमका काय संदेश दिला आहे? याचा विचार केला असता प्रामुख्याने दोन महत्त्वपूर्ण बाबींचा उल्लेख करणे अनिवार्य ठरेल असे मला वाटते. त्यातील पहिले असे की, १५ सप्टेंबर १९३८ ला काँग्रेस सरकारने मुंबई कायदेमंडळात आणलेल्या कामगारांच्या नागरिक स्वातंत्र्यास विघातक अशा ट्रेड डिस्प्युट बिलाच्या पहिल्या वाचन प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय मुद्देसूद संदेश दिला होता. त्याप्रसंगी ते म्हणाले होते की, कामगारावर गुलामगिरीचे बंधने लादणे हे लोकशाहीचे विडंबन होय. तर दुसरी बाब अशी की, ८ ते १७ सप्टेंबर १९४३ च्या दरम्यान 'द इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' या संस्थेच्या वतीने 'द ऑल इंडिया ट्रेड युनियन स्टडी कॅम्प' चे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी समारोपिय सत्रात १७ सप्टेंबर १९४३ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, शासन यंत्रणेचा ताबा घेणे कामगारांचे ध्येय असावे. या ऐतिहासिक संदेशाला आजच्या संदर्भात तपासून पाहण्याची नितांत आवश्यकता आहे.

१५ सप्टेंबर १९३८ ला काँग्रेसने ट्रेड डिस्प्युट बिल का आणले? याचा विचार केला असता हे लक्षात येते की, १९३४ मध्ये संप बंदी कायदा अस्तित्वात आला होता. ज्यात तडजोड घडवून आणणारी एखादी संस्था स्थापण्याकरिता हे बील पास करण्यात आले होते. मात्र यात केली जाणारी तडजोड ही ऐच्छिक होती. तर त्यावेळी म्हणजे १५ सप्टेंबर १९३८ ला सादर केलेल्या बिलात ही तडजोड सक्तीची केली जाणार होती. सर रॉबर्ट बेल यांनी पहिल्यांदा सादर केलेल्या बिलात सुद्धा सक्तीची तरतूद केली होती, परंतु पास करताना मात्र ऐच्छिक ठेवली. त्यामुळे बदलत्या काळानुसार संपक–यांची वाढती मागणी लक्षात घेऊन त्यांना ती सक्तीची करणे आवश्यक वाटले होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आकडेवारीसह संपात भाग घेतलेल्या कामगारांची संख्या व फुकट गेलेल्या दिवसाची संख्या हे कालपरत्वे कमी कमी होत गेली असल्याचे स्पष्ट केले. ज्यामुळे त्यांना ते कारण पटण्यासारखे नसल्याचे जाहीर केले होते.

त्या बिलातील ६२ व्या प्रकरणानुसार संप करण्याचा अधिकार नाकारून संपक–यांना शिक्षेची तरतूद करण्यात आली होती. त्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खंडण करताना स्पष्ट केले आहे की, संप करणे म्हणजे नौकरीचा करार मोडणे होय. करार मोडणे हा गुन्हा असला तरी तो फौजदारी स्वरुपाचा गुन्हा होऊ शकत नाही. अशावेळी हा गुन्हा दिवाणी स्वरूपाचा मान्य केल्यास या गुन्ह्यामुळे ज्या कामगारांचे नुकसान होणार आहे त्यांना भरपाई मिळायला पाहिजे. या अनुषंगाने १८५९ ला ब्रीच ऑफ कॉनिट्रॅक्ट कायदा अस्तित्वात ( ईशरलह`ष उेपीीरलीं) आला होता. ज्याची फारशी अंमलबजावणी झाल्याचे आढळून येत नाही.

कामगारांना संपाचा हक्क नाकारणे म्हणजे त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध काम करायला लावून गुलाम बनविण्यासारखेच होते. ज्यामुळे त्यांच्या हक्काला बाधा पोहोचते. म्हणून कामगारांचा संप हा कुठल्याही कायद्याने बेकायदेशीर ठरू शकत नाही. मात्र या बिलात संप करणे हा गुन्हा ठरवून काँग्रेस सरकारने कामगारांवर गुलामगिरी लादण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या बिलाचे नामकरण 'कामगारांचे नागरिक स्वातंत्र्य हिरावून घेणारा' कायदा असे केले होते. जिथे कामगारांच्या लोकशाही मूल्यांवर गदा आणली जाते तिथे लोकशाही नाकारली जात असल्याने कामगारांवर गुलामगिरीची बंधने लादने हे लोकशाहीचे विडंबन होय. असे बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते.



पुढे जाऊन १७ सप्टेंबर १९४३ ला द ऑल इंडिया ट्रेड युनियन वर्क्स स्टडी कॅम्पच्या समारोपिय सत्रात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, संसदीय लोकशाहीत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळावर अंकुश ठेवण्यासाठी न्यायपालिकेची व्यवस्था असताना सुद्धा इटली, स्पेन, जर्मनी सारख्या राष्ट्रात या विरोधात बंड का करण्यात आले होते? याची शहानिशा करण्याची आवश्यकता आहे. तरीही याची भारतीय परिप्रेक्ष्यातून बघता त्याची गरज असल्याचे नमूद केले आहे. अशा प्रकारची संसदीय लोकशाही हुकुमशाही राष्ट्रात अयशस्वी ठरत असते. ज्यात प्रबळ सत्ताधारी दुर्बलावर अन्याय करीत असल्याने सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी अडसर निर्माण होतो. ज्यामुळे गरिबांच्या दु:खात आणखी भर घातली जाते. परिणामी सामाजिक व आर्थिक समता नसल्यास केवळ राजकीय समतेचा फारसा उपयोग होत नसतो. संसदीय लोकशाहीत समतेचे महत्त्व न कळाल्याने स्वातंत्र्य व समतेचा मेळ बसू शकला नाही म्हणून जेवढी समता कमी झाली तेवढीच विषमता वाढली परिणामी ही दरी रुंदावतच गेली. मात्र इंग्लंड, अमेरिकेसारख्या राष्ट्रात याचे चांगले परिणाम पहायला मिळतात कारण त्यांनी समाजात समता स्थापित करण्याच्या दृष्टीने गरीब व श्रीमंतातील दरी त्या प्रमाणात कमी केलेली आहे. हे मानवीय शहाणपणाचे लक्षण आहे. करिता रुसोचे 'सामाजिक करार', मार्क्सचा 'कम्युनिस्ट जाहीरनामा', १३ व्या पोपसह लियोची 'कामगारांची स्थिती' व जॉन स्टुअर्ट मिलचे 'स्वातंत्र्य' ही चार मूलभूत पुस्तके कामगारांसह सर्वांनीच वाचली पाहिजेत असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सल्ला दिला असून सत्ता संपादन करणे हेच एकमेव ध्येय कामगारांनी ठेवले पाहिजे. अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

यावर सद्यस्थितीत विचार करताना सरकारने ४४ कामगार कायद्यांचे ४ कायद्यात रुपांतर करून कामगारांच्या कामाचे तास वाढविणे, नेमक्या ठराविक पगारावर कामगार नेमताना त्यांना काम सोडून जाता येऊ नये. अशी बंधने लादणे, किमान वेतन मिळण्याची अंमलबजावणी न करणे व कत्राटीकरणाचा घाट घालून प्रत्यक्ष काम करणाऱ्यांना त्यांच्या हक्काचा मेहनताना न मिळू देणे इत्यादी तरतूदी करून भारताचे संविधानात अंतर्भूत असलेले कामगारांचे हक्क अधिकार हिरावून घेतले जात आहेत काय? या अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी प्रयत्न करने ही आपली सर्वांचीच जबाबदारी व कर्तव्य आहे. ती आपण पार पाडली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझ्या लेखणीला तात्पुरत्या स्वरुपात विराम देतो.

***********

लेखक : बी. बी. मेश्राम, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि नाग असोसिएशन (आईना).
संपर्क : ९४२१६७८६२८

# काश्मीर आतून धगधगतंय!

अनुच्छेद ३७० रद्द झाला, दहशतवाद्यांच्या कारवाया कमी झाल्या, रस्ते गजबजलेले , व्यवहार सुरळीत आहेत, म्हणून काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित झाली आहे, असे म्हणणे कितपत योग्य? सीमेपलीकडून रसदपुरवठा पुन्हा सुरू झाला तर काय? निवडणुकीनंतर समीकरणे बदलतील का? 'आझादी'च्या ठिणगीला हवा दिली गेली तर काय होईल? या प्रश्नांची उत्तरे दिल्लीतील सत्ताधाऱ्यांना शोधावी लागतील श्रीनगरमधील दल लेकच्या समोरील एका रेस्तराँमध्ये लष्करी अधिकाऱ्याशी गप्पा मारत असताना आसपासची गजबज बघून काश्मीर खोऱ्यात खरोखरच शांतता निर्माण झाली आहे, असे वाटून गेले. शहरांमध्ये रात्री दुकाने–हॉटेल्स उघडी होती. रस्त्यावर रहदारी होती. कुठल्याही शहरामध्ये असते तसेच, सर्वसामान्य वातावरण होते. अनुच्छेद ३७० ठेवले किंवा काढून घेतले तरी काय फरक पडतो? इथे सगळेच सुरळीत असेल तर विनाकारण 'कश्मिरियत'वर कशाला बोलायचे, असाही विचार मनात येऊन गेला. लोक म्हणत होते की, इथे आता पूर्वीसारखी दगडफेक होत नाही. काश्मिरी लोकांच्या बोलण्यावरून वाटले की, खोऱ्यातील असंतोषाचे दिवस संपुष्टात आले आहेत. आता फक्त विकासाच्या गोष्टी केल्या पाहिजेत! रेस्तराँमधील रात्रभोजन संपवून दुसऱ्या दिवशी श्रीनगरमधील निवासी कॉलनीमध्ये एका बुजुर्गाला भेटायला गेलो. शेख अब्दुल्ला–फारुख अब्दुल्लांपासून काश्मीरमधील बहुसंख्य विभाजनवादी नेत्यांपर्यंत, इंदिरा गांधी अटलबिहारी वाजपेयींपर्यंत दिल्लीतील अनेक नेत्यांमध्ये त्यांची उठबस होती व आहे. सोनमर्गमध्ये एक आंतरराष्ट्रीय दहशतवादी लपून बसल्याची माहिती याच व्यक्तीने तत्कालीन वाजपेयींच्या सरकारला दिली होती! त्यांच्या घराच्या हिरवळीवर गप्पा मारता मारता ते म्हणाले, काश्मीर आतून धगधगतंय. वरवर शांतता दिसत असली तरी लाव्हा कधी बाहेर पडेल सांगता येणार नाही. त्यांचे विधान आश्चर्यचकित करणारे होते. श्रीनगरच्या रस्त्यावर एक दगडदेखील फेकला जात नाही मग, अशांतता कसली, असा प्रश्न मनात येऊन गेला. हे गृहस्थ म्हणाले, माझ्या आसपास अनेक तरुणांकडे बंदुका आहेत. मी त्यांना ओळखतो, ते कधी इथे असतात, कधी नसतात. एका घराकडे बोट दाखवून ते म्हणाले की, त्या घरातील मुलगा आणि आई दोघेही दगडफेक करण्यात पुढे होते. आता शांत बसले असले तरी मुलाकडे बंदूक आहे. अशा बंदुका कधीही बाहेर निघू शकतात! मग, काश्मीर खोऱ्यात इतकी शांतता का दिसते आहे, असे एका अनुभवी पत्रकाराला विचारले. त्यांचे म्हणणे होते की, पाकिस्तानने 'पाण्याचा नळ' बंद केला आहे, अंतर्गत असंतोष शमवण्यामध्येच त्यांची ताकद वाया जात असावी. ते नळ सुरू करतील तेव्हा दहशतवादी हल्ले होऊ लागतील. या पत्रकाराची हयात काश्मीर खोऱ्यात गेली आहे, त्याची माहीतगारांची फळीही खोलवर रुजलेली आहे. त्यांचे म्हणणे होते की, जम्मू विभागात होत असलेले दहशतवादी हल्ले काश्मिरी तरुणांकडून होत नाहीत, त्यामागे प्रशिक्षित दहशतवादी आहेत. हीच माहिती अन्य एका स्रोताकडूनही मिळाली. गेले काही महिने जम्मू विभागातील राजौरी–पुंछच्या पहाडी भागांमध्ये दहतशवादी हल्ले होत आहेत. हा लेख लिहीत असतानाच काश्मीर खोऱ्यात बारामुल्लामध्ये दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली जात असल्याचे वृत्त आले. २०१९ नंतर काश्मीर खोऱ्यात तुलनेत कमी झालेले दहशतवादी हल्ले पुन्हा सुरू होण्याचा धोका तर नसेल, असा मनात विचार येऊन गेला. २०१६ मध्ये दहशतवादी बुऱ्हाण वाणीला लष्कराने ठार मारल्यानंतर काश्मीरमध्ये बंदुका हाती घेणाऱ्या तरुणांचा ओघ वाढला होता. हे सगळे तरुण खोऱ्यातील होते, त्यांना पाकिस्तानातून बंदूक चालवण्याचे प्रशिक्षण मिळालेले नव्हते. रागाच्या भरात या तरुणांना बंदुकांचा मार्ग योग्य वाटला होता. एकावेळी खोऱ्यात 'विनाप्रशिक्षित' २००–३०० तरुण दहशतवादी होते, आताही त्यांची संख्या साधारण तेवढीच असावी असे सांगितले जाते. काहीजण बंदुका हाती घेतल्यानंतर आठवड्याभरातच काय एखाद–दोन दिवसांतही मारले जातात. या दहशतवाद्यांचे आयुष्य जेमतेम सहा महिने. आपले आयुष्य संपलेले आहे, याची जाणीव या तरुणांना असते. तरीही ते बंदुकांसह छायाचित्रे काढून 'फेसबुक'वर टाकत होते, अनेकांनी चित्रफीत अपलोड करून आपण दहशतवादी झाल्याचे घोषित केले होते. त्यांच्या हालचाली इंटरनेटमुळे आणि त्यांनी स्वत:च गाजावाजा केल्यामुळे समजत असत. आता सगळ्या गोष्टी भूमिगत झाल्या आहेत. बंदूक हाती घेतल्याची घोषणा कोणी तरुण 'फेसबुक'वरून करत नाही. इंटरनेटचा वापर कमीत कमी केला जातो. दहशतवाद्यांनी 'कामाची पद्धत' बदलली आहे, असे काहींचे म्हणणे आहे. काश्मीर खोऱ्यातील घडामोडींची माहिती असलेल्या उच्चपदस्थाच्या म्हणण्यानुसार, इथले वातावरण हवा भरलेल्या फुग्यासारखे झाले आहे, हा फुगा फुटून निचरा झाला पाहिजे तरच इथले वातावरण कायमचे सुधारू शकेल! या विधानाचे वेगवेगळे अर्थ निघू शकतात. असो. अनुच्छेद ३७० रद्द केला, म्हणून लोकांमधील अस्मिता संपुष्टात आली असे नव्हे. 'आझादी'ची भावना नाहीशी झाली असेही नाही. 'जमात–ए–इस्लामी' ही बंदी घातलेली संघटना कर्मठ इस्लामवादी. धर्माच्या आधारे काश्मीर पाकिस्तानमध्ये विलीन झाले पाहिजे ही 'जमात'ची भूमिका आहे. निवडणुकीच्या माध्यमातून 'जमात'ला मुख्यधारेत आणण्याचा कितीही प्रयत्न केला तरी 'जमात'ची विचारसरणी बदलण्याची शक्यता नाही. ही संघटना काश्मिरींच्या अस्मितेला बळ देते, पाकिस्तानच्या मदतीने खोऱ्यात दहशतवाद्यांसाठी 'सुपीक जमिनी'ची मशागत 'जमात'ने केली, हे कोणीही नाकारू शकत नाही. खोऱ्यात 'जमात'चे सुमारे २० हजार सक्रिय सदस्य आहेत, असा दावा या संघटनेच्या एका नेत्याने केला. अख्ख्या काश्मीर खोऱ्याची लोकसंख्या सव्वाकोटी आहे. हे पाहिले तर 'जमात'ची सक्रियता किती घातक असेल हे उघड होते. हीच 'जमात' आता विधानसभा निवडणुकीत उतरली आहे.



खरे तर जम्मू–काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना खोरे ज्वालामुखीच्या तोंडावर तर बसलेले नाही ना, असा प्रश्न मनात येऊन जातो. १९८७च्या विधानसभा निवडणुकीची पुनरावृत्ती २०२४ मध्ये झाली तर काय, अशी भीती व्यक्त करणे चुकीचे नसावे. त्यावेळीही नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसच्या आघाडीने जिंकली होती. ही निवडणूक फसवून जिंकल्याचा आरोप करत यासीन मलिकसारख्या तत्कालीन तरुणांनी पाकिस्तान गाठले होते, त्यांनी बंदुका हाती घेतल्यानंतर खोऱ्यात दहशतवादाने थैमान घातले होते. या निवडणुकीत 'जमात'ने पाठिंबा दिलेले अपक्ष उभे आहेत, ते हरले व त्यांनी पुन्हा फसगत झाल्याचा आरोप करत खोऱ्यात दहशतवादाचे थैमान घातले तर? हा धोका असणारच नाही असे ठामपणे कोणी सांगू शकणार नाही. केंद्र सरकारने 'जमात'ला लोकशाही प्रक्रियेत येणे भाग पाडले असले तरी, केंद्राने आम्हाला धोका दिला असा आरोप करून पुन्हा खोरे पेटवून दिले तर त्याची मोठी किंमत काश्मीरला मोजावी लागेल असे विश्लेषक, राजकीय नेते, पत्रकारांशी बोलल्यानंतर वाटत राहिले. एका मुद्द्यावर फारशी चर्चा झालेली नाही पण, काहींच्या बोलण्यामध्ये बांगलादेशाचा संदर्भ आला. बांगलादेशातील अराजकाचा जम्मू–काश्मीरशी थेट संबंध नसेल पण, तिथल्या लोकांच्या कथित उठावामागे अमेरिका, पाकिस्तान, चीन अशी विविध आंतरराष्ट्रीय हस्तक्षेपांची शक्यता व्यक्त केली जाते. मुस्लीमबहुल बांगलादेशमध्ये जमिनीखालील असंतोषाला जाणीवपूर्वक खतपाणी घातले गेले असेल तर काश्मीर खोऱ्यामध्येही अनुच्छेद ३७० आणि इतर अनेक मुद्द्यांवरून उफाळून येऊ शकणाऱ्या असंतोषाला वाट काढून दिली जाऊ शकते. विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने 'आझादी'वाल्या इंजिनीअर रशीद आणि इतरांना अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन मिळाले आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. लोकसभा निवडणुकीमध्ये इंजिनीअर रशीद बारामुल्ला मतदारसंघातून उभे राहिले हेच आश्चर्यकारक म्हणता येईल. रशीद यांना दिल्लीतून कोणाचा तरी भक्कम पाठिंबा असल्याशिवाय त्यांचा उमेदवारी अर्जदेखील स्वीकारला गेला नसता, असे काहींचे म्हणणे आहे. रशीद तिहार तुरुंगात असताना त्यांचे पुत्र अब्रार व त्यांच्या कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधातील लोकांच्या भावनांना साद घातली. अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतर झालेल्या कोंडमाऱ्याची ही प्रतिक्रिया होती आणि लोकसभा निवडणुकीत लोकांचे भारतविरोधी मत मतपेटीतून व्यक्त झाल्याचे मानले गेले. इंजिनीअर रशीदसारखे विभाजनवादी नेते 'आझादी'ची भावना खोऱ्यात कायम ठेवण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळेच विभाजनवाद्यांना ताकद मिळेल असे धोरण राबवून खोऱ्यात शांतता निर्माण होईल की, असंतोषाला इंधन पुरवले जाईल, याचा विचार दिल्लीतून करावा लागणार आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये जम्मू–काश्मीरमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाला बहुमत मिळण्याची शक्यता नाही. इथे दोनच प्रमुख प्रादेशिक पक्ष आहेत. मेहबूबा मुफ्ती यांचा 'पीडीपी' आणि अब्दुल्लांचा 'नॅशनल कॉन्फरन्स'. लोकसभा निवडणुकीत ओमर अब्दुल्लांचा पराभव कोणामुळे व कसा झाला हे लोकांना माहीत आहे. विधानसभा निवडणुकीतही 'नॅशनल कॉन्फरन्स'ला बहुमत न मिळण्याची व्यूहरचना केल्याचे सांगितले जाते. पण, त्यातून 'आझादी'वाल्यांना बळ मिळाले तर या राजकीय धोरणाच्या दुष्परिणामाची जबाबदारी दिल्लीमध्ये कोण घेणार, असे विचारता येऊ शकेल. २०१९ पासून जम्मू–काश्मीरमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने कठोर पावले उचलली गेली. त्यामुळे खोऱ्यातील लोकांना पासपोर्ट, व्हिसा देताना, सरकारी नोकरी देताना सखोल चौकशी केली जाऊ लागली. या चौकशीचा सर्वात मोठा फटका वाट चुकलेल्या अनेकांना बसल्याचे सांगितले जाते. तरुणांना रोजगार मिळणे गरजेचे असले तरी कुटुंबाची पार्श्वभूमी तपासून पाहिली जाते. कधी कधी दोन दशकांपूर्वी दूरच्या नात्यातील कोणी बंदूक हातात घेतली असेल तरी नोकरीवर पाणी सोडावे लागू शकते. जम्मू–काश्मीरमध्ये बेरोजगारी ही गंभीर समस्या असून रोजगार उपलब्ध करून देणे हे मोठे आव्हान आहे. पण, अनेकदा या तरुणांच्या कुटुंबातील एखाद्या सदस्याचा दहशतवाद्यांशी संबंध आला असेल, त्या सदस्याने कदाचित एखाद–दोन महिन्यांसाठी बंदूक हाती घेतलेलीही असू शकेल. पण, कुटुंबातील सदस्याच्या पार्श्वभूमीमुळे संबंधित तरुण नोकरीला मुकू शकतो. काश्मीर खोऱ्यातील अनेकांना परदेशात नोकरीची संधी मिळू शकते पण, कुटुंबाच्या पार्श्वभूमीमुळे त्यांना ना पासपोर्ट मिळतो ना व्हिसा. नोकरी नसल्यामुळे, ती मिळण्याची संधीही गमावलेले आणि त्यामुळे मोकळे भटकणारे अनेक तरुण अखेर एकाच दिशेने जाऊ शकतील! काश्मीर हे असे आतून धगधगत आहे. वरवर दिसणाऱ्या शांततेमुळे दिल्लीकरांनी स्वत:ची पाठ थोपटून घेतली नाही म्हणजे मिळवले.

# सिडको प्रशासनाचा भोंगळ कारभार वाशी रेल्वे स्टेशन समोरील पे अँड पार्क मधील दुरावस्था

नवी मुंबई / के.एच.हनवते :- वाशी रेल्वे स्थानक येथील कल्याण ज्वेलर्स समोरील पे अँड पार्क सिडको चे वतीने कंत्राटी तत्त्वावर चालवले जाते या ठिकाणी गाड्या पार्किंग चे नागरिकांकडून पैसे आकारले जातात. या पे अँड पार्क चे प्रवेशद्वारा समोरच भले मोठे खड्डे रस्त्याला पडलेले आहेत. संपूर्ण पार्किंग मध्ये रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे त्या मुळे गाड्या पार्क करून जाताना नागरिकांना मात्र तारेवरची कसरत करावी लागते. पार्किंग मध्ये भंगार गाड्यांचे आणि कचऱ्याचे साम्राज्य आहे अश्या अनेक त्रुटी या पार्किंग मध्ये दिसून आल्या आहेत. नागरिकांकडून मात्र गाड्या पार्क करण्याचे पैसे आकारले जातात पण येथील रस्त्याकडे आणि कचऱ्याचे ढिगारे यांच्या कडे मात्र सपशेल दुर्लक्ष केले जात आहे. आमच्या विशेष प्रतिनिधीने या ठिकाणी चौकशी केली असता ३ ते ४ महिने झाले आम्ही तक्रार केली आहे पण सिडको प्रशासन लक्ष देत नाही असे येथील कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. जर नागरिकांकडून तुम्ही गाड्या पार्क करायचे पैसे घेता मग त्यांना पुरेश्या सेवा तरी द्यायला पाहिजेत ना ? ज्या





भंगार गाड्या आहेत त्यांच्या कडून भाडे आकारले जाते का ? सिडको ने केलेल्या कंत्राट प्रमाणे नक्की येथे चोख कामकाज चालते का याच सोबत रस्त्याची झालेली दुरावस्था सिडको ने तात्काळ दुरुस्त करून द्यावी असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

## चुकूनही चेहऱ्यावर डायरेक्ट लावू नका 'हे' पदार्थ,अन्यथा सुंदर चेहरा होईल खराब

सुंदर आणि चमकदार त्वचा मिळवण्यासाठी अनेक महिला सतत काहींना काही उपाय करत असतात. कधी फेशिअल करणे, कधी केमिकल ट्रीटमेंट करून घेणे इत्यादी अनेक उपाय करत असतात. पण सतत काहींना काही उपाय करत राहिल्यामुळे त्वचा खराब होण्याची शक्यता असते. अनेकदा सुंदर त्वचा मिळवण्याच्या नांदात त्वचेला कोणतेही पदार्थ लावतात. पण हेच पदार्थ त्वचेसाठी हानिकारक ठरतात. पिंपल्स मुक्त आणि सुंदर त्वचा मिळवण्यासाठी मधील घरगुती उपाय करून पाहतात. पण काहीवेळा घरगुती उपाय त्वचेसाठी घातक ठरतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला कोणते पदार्थ त्वचेवर थेट लावू नये? यामुळे चेहऱ्याचे कोणते नुकसान होते? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.लिंबाचा रस: अनेक महिला सुंदर आणि चमकदार त्वचा मिळवण्यासाठी चेहऱ्यावर लिंबाचा रस लावतात. पण लिंबाचा रस थेट चेहऱ्यावर लावू नये. यामुळे त्वचा रोग होण्याची शक्यता असते. लिंबूमध्ये असलेल्या असिडमुळे त्वचा खराब होऊ शकते. लिंबाच्या रसात मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे योग्य प्रमाणात जर त्वचेवर लिंबाचा रस लावला नाहीतर चेहरा लाल होऊन जातो. त्यामुळे लिंबाचा रस चेहऱ्यावर थेट लावू नये.मोहरी तेल: मोहरीच्या तेलाचा वापर जेवण बनवण्यासह इतर अनेक गोष्टींसाठी केला जातो. पण मोहरीचे तेल त्वचेसाठी योग्य नाही.

# गुहागर तालुका बौद्धजन मागासवर्गीय नागरी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न



गुहागर :- बौद्धजन मागासवर्गीय नागरी पतसंस्था मर्यादित या पतसंस्थेची प्रथम सर्वसाधारण सभा पतसंस्थेचे प्रवर्तक के. सी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली तसेच पतसंस्थेच्या बहुसंख्य भागधारकांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, जानवळे शृंगारतळी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सदर प्रसंगी उपस्थित भागधारकांमधून जेष्ठ नागरिकांच्या शुभहस्ते महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार आणि पुष्पसुमन अर्पण करण्यात आली तर जेष्ठ महिला भागधारकांच्या शुभहस्ते ज्योत प्रज्वलित करून पतसंस्थेच्या सर्वसाधारण सभेला सुरवात करण्यात आली. प्रवर्तक महेंद्र मोहिते यांनी लाघवी भाषेत व प्रभावी शैलीत सूत्रसंचालन करून उपस्थितीतांची मने जिंकून घेतली, तर प्रवर्तक दीपक मोहिते यांनी प्रस्ताविक सादर करताना इसवीसन १९५१ साली बौद्धजन सहकारी संघाची स्थापना झाली असून त्यास ७३ वर्षे पूर्ण झाली आहेत व सध्या संस्था अमृतमहोत्सवी वर्षाकडे वाटचाल करीत आहे संस्थेने आजवर अनेक सामाजिक कार्यात सहभाग घेतला परंतु आजवर सहकारी पतसंस्था निर्माण केली नव्हती कदाचित आधी त्याबाबत प्रयत्न झाला असेल परंतु त्याला यश न आल्याने ते शक्य झाले नसेल, पतसंस्थेच्या ध्येय आणि धोरण मधील कलम क्र. १५ मध्ये सहकारी पतसंस्थेची बँक निर्माण करून संस्थेची आर्थिक उन्नती करून सर्वसामान्य नागरिकांना स्वतःच्या पायावर उभे करण्याच्या दृष्टीने सदर कलमाची तरतूद असून जे आधी शक्य झालं नव्हतं ते आज आपल्या सर्वांच्या प्रयत्नांने व सहकार्याने शक्य झाले आहे, त्यामुळे आजचा दिन हा ऐतिहासिक सुवर्णदिन आहे, आता ही संस्था वाढविणे पुढे घेऊन जाणे हे सर्वस्वी तुमच्या हातात आहे व तुम्ही ती पुढे घेऊन जाल अशी मी आशा बाळगतो, सोबतच सदर पतसंस्था ही सहकार क्षेत्र सहकार संस्था कायदा १९६० नुसार चालणार आहे तर बौद्धजन सहकारी संघ संस्था ही धर्मदाय आयुक्तालय कायद्यानुसार चालणारी आहे हा फरक सर्वांनी लक्षात घेतला पाहिजे व त्याच अनुषंगाने दोन्ही संस्था आपापल्या कार्याची पूर्तता करतील व त्यास मी स्वतः व आपण सर्वांनी मिळून मदत करावी असे नमूद करून सदर पतसंस्था निर्माण करण्यासाठी योगदान देणाऱ्या प्रत्येक विभागातील सर्व सभासदांचे व उपस्थितीतांचे आभार मानले त्यासोबतच परिपत्रकावर असलेले सर्वच विषय खेळीमेळीच्या वातावरणात सर्वांच्या संमतीने मंजूर करण्यात आले व एक वर्षाच्या कालावधीसाठी हंगामी कमिटीची स्थापना करण्यात आली. सदर कार्यक्रमास प्रवर्तक मा. के. सी. जाधव, मा. राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, मा. संजय पवार, मा. दीपक मोहिते, मा. विश्वनाथ कदम, मा. संजय तांबे, मा. सुनील जाधव, मा. शांतीदूत जाधव, मा. शैलेंद्र पवार, मा. विश्वास मोहिते, मा. महेंद्र मोहिते, मा. रुपेश सावंत, मा. साक्षी जाधव व सहकारी संस्थेचे व्हाईस चेअरमन अशोक कदम उपस्थित होते त्यासर्वांनी शुभेच्छापर आपले विचार मांडून पतसंस्था म्हणजे काय ? पतसंस्थेचा ग्रामीण भागातील बांधवांना उपयोग व फायदे काय ? यासंदर्भात सविस्तर माहिती देऊन पतसंस्थेच्या सहकार तत्वावर चालणाऱ्या कार्याबाबत व बौद्धजन सहकारी संघाच्या सामाजिक दृष्टीने चालणाऱ्या कार्याबाबत माहिती देऊन दोघांमधील फरक आपल्या भाषणात स्पष्ट करून दिले. सदर प्रसंगी भागधारकांमधून विभाग क्र. १ चे बाळकृष्ण पवार (वरवेली), विभाग क्र. २ चे रमेश पवार (कारोळ), विभाग क्र. ३ चे मनोज गमरे (चिखली), विभाग क्र. ४ चे सुरस्त जाधव (मळन), नितीन पवार (पोमेंडी), विभाग क्र. ५ चे संजय शिवराम जाधव, विभाग क्र. ६ चे शहानंद पवार, विभाग क्र. ७ चे प्रकाश जाधव, महिला प्रतिनिधी सौ. साक्षी जाधव यांनी आपल्या शाखा व विभागाच्या वतीने आपले मनोगत व्यक्त केले व गुहागर तालुक्यात प्रथमच ही पतसंस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत अथक परिश्रम घेणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आपल्या शाखा व विभागाच्या वतीने आभार व्यक्त करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सरतेशेवटी बौद्धजन सहकारी संघाचे चेअरमन व पतसंस्थेचे प्रवर्तक विश्वनाथ कदम यांनी सर्वसाधारण सभेचा आढावा घेऊन ऐतिहासिक सुवर्णदिनानिमित्त उपस्थित सर्व भागधारकांचे तसेच पतसंस्था निर्माण करण्यासाठी तालुक्यातील सर्वच विभागातील कार्यकर्त्यांनी जे मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे आभार मानून तसेच पुढे ही पतसंस्था गतिमान करण्याकरता शेवट पर्यंत सहकार्य करून पतसंस्थेच्या रुपात लावलेले बीज वटवृक्षात रूपांतरित कराल अशी आशा व्यक्त करून सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## सामाजिक कार्यकर्त्या श्रीमंती रंजिता ओतारी यांना मुंबई येथे राज्यस्तरीय कर्तुत्ववान महिला नारीरत्न पुरस्कार २०२४ ने सन्मानित

मुंबई :- मुंबई येथे दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती रंजिता ओतारी यांना राज्यस्तरीय कर्तुत्वान महिला नारीरत्न पुरस्कार २०२४ सन्मानित करण्यात आले. गेले अनेक वर्ष महिलांचे आरोग्य, मुलांचे करिअर विषयी मार्गदर्शन करणाऱ्या तसेच रंजिता चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून मुलं महिला यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या त्यांना संस्थेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या सामाजिक शैक्षणिक कला क्रीडा सांस्कृतिक तसेच प्रत्येक गावात शहरात महिलांना मोफत प्रशिक्षण कार्यशाळा व मार्गदर्शन देऊन सक्षम करणाऱ्या खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांना वेळेत मदत व्हावी या निरपेक्ष हेतूने त्यांनी प्रत्येक उपक्रम राबविला जातो. प्रत्येक कल्पक उपक्रम हा लोकपयोगी तर ठरलाच पण संस्थेच्या कार्याचा एक वेगळाच ठसा उमटवीत गेला. सामान्यांना अडी- अडचणीच्या वेळी मदत करत शिवाय कोरोनाच्या काळात शासनाच्या प्रवासातील निर्बंधामुळे अत्यावश्यक असलेला युनिवर्सल पास एक हजारहून अधिक नागरिकांना मोफत वाटप करीत श्रीमती रंजिता ओतारी यांनी वेळेवर मदत करण्याचं आपलं दायित्व दाखवून दिलं. ग्रामीण भागातील नागरिकांनी त्यांच्या उपक्रमाचे विशेष कौतुक करीत त्यांचे आभार मानले. वेळेत मदत करणे हा स्वभाव असणाऱ्या रंजिता ओतारी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी ही विशेष आग्रही आहेत. विद्यार्थी हा या देशाचा पाया आहे आधारस्तंभ आहे हे जाणत त्यांनी मुलांसाठी गडकिल्ल्या स्पर्धा शिवजयंती निमित्त महाराज तुमच्या मनातले ही काव्य, चित्र निबंध स्पर्धा मुलांना वाचण्यासाठी पुस्तक भेट त्यांच्या यशस्वी करिअरसाठी गावात शहरात मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन असे विविध उपक्रम त्यांनी यशस्वीपणे राबवले. स्वतः महिला असल्याने महिलांचे प्रश्न त्यांच्या दैनंदिन अडचणी जाणतात आणि त्या सोडविण्यासाठी त्यांच्या फाउंडेशनच्या माध्यमातून नेहमीच प्रयत्नशील ही असतात महिलांच्या आरोग्य विषयी शिबिराचे आयोजन महिला मुलींसाठी विविध सण वारा निमित्त गौरी गणपती सारख्या विविध स्पर्धांचे आयोजन कोरोना काळात गृहिणींना किरणामालाचे वाटप वीर पत्नी व विधवा महिलांसाठी हळदीकुंकू सन्मान समारंभ तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा नारी सेवा गौरव पुरस्कार देत सन्मान महिला पोलिसांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात समाजाप्रतीचा खारीचा वाटा उचलण्याचा प्रामाणिक



प्रयत्न करत असतात. ज्यांचे मार्गदर्शक अनेक वर्षांचा अनुभव समृद्ध बनवतो अशा जेष्ठ नागरिकांसाठी त्यांनी रंजिता ज्येष्ठ नागरिक मंचाची स्थापना केली समाजाला दिशा देणारे पत्रकार शिक्षक पोलीस नगरपालिका कर्मचारी आरोग्य कर्मचारी यांचा वेळोवेळी यथोचित सन्मान करणे हे त्यांचे कर्तव्य समजतात या सगळ्या कार्याची दखल घेऊन मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी या संस्थेच्या वतीने दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबई येथे राज्यस्तरीय कर्तुत्व महिला नारी रत्न पुरस्कार सन्मानपत्र, गौरवपदक, महावस्त्र, आणि सन्मान चिन्हं देऊन श्रीमती रंजिता विजय ओतारी,रंजिता चॅरिटेबल फाउंडेशन अध्यक्ष त्यांचा सन्मान करण्यात आला.

## वर्षभर आरोग्यासाठी ऋतुचर्येच्या चिरंतन आयुर्वेदिक विधीचा स्वीकार करा



ऋतुचर्या हा आयुर्वेदाच्या मूलभूत पैलूंपैकी एक आहे. ती आरोग्य राखण्यासाठी आणि रोग टाळण्यासाठी हंगामी आहारपद्धतीला संबोधित करते. 'ऋतुचर्या' हा शब्द 'ऋतु' म्हणजे ऋतू आणि 'चर्या' म्हणजे नियम किंवा आचरण यावरून आला आहे. प्रत्येक बदलत्या वातावरणाबरोबर शरीरात सुसंवाद आणण्यासाठी प्रत्येक हंगामासाठी तयार केलेल्या आहार आणि जीवनशैली पद्धतींचा हा एक संच आहे. ऋतुचर्या या वस्तुस्थितीवर भर देते की मानवी शरीर हे स्थूल जगताचे सूक्ष्म रूप आहे आणि अशा प्रकारे हंगामी बदलांमुळे त्याच्यावर खोलवर परिणाम होतो. वेलनेस बाय हार्टफुलनेसच्या सीएमडी, आचार्य डॉ. श्रीवर्मा यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे. ऋतुचर्येची मूलभूत तत्त्वे: आयुर्वेद वर्षाचे सहा ऋतूंमध्ये वर्गीकरण करतो, जे प्रत्येकी अंदाजे दोन महिने टिकतात. हे ऋतू आहेतः वसंत (वसंत), ग्रीष्म (उन्हाळा), वर्षा (पावसाळा), शरद (पानगळ), हेमंत (हिवाळ्याची सुरूवात), शिशिर (हिवाळ्याचा शेवट) दोष आणि ऋतू यांच्यातील संबंधः वातदोषः हवा आणि आकाशाने बनलेला, वात शरीरातील संवाद आणि हालचाल निर्देशित करतो. शरद ऋतूत आणि हिवाळ्यात वातदोष वाढू शकतो. या हंगामात आर्द्रता वाढल्याने सांधेदुखी आणि पचनाच्या समस्या सामान्यतः दिसून येतात. पित्त दोष : अग्नी आणि पाण्याने बनलेला पित्त पचन आणि चयापचय नियंत्रित करतो. उन्हाळ्यातील उष्णता पित्त दोषामध्ये असंतुलन आणू शकतो. अति उष्णतेमुळे पुरळ, चिडचिड आणि आम्लता होऊ शकते. कफ दोष : पृथ्वी आणि पाणी मिळून कफ दोष तयार होतो. हे द्रवाचे संतुलन आणि रचना नियंत्रित करते. वसंत ऋतूची वेळ अशी असते जेव्हा कफ दोष वाढू शकतो. कफ वितळल्याने सर्दी आणि ॲलर्जी होतात. प्रत्येक हंगामासाठी ऋतुचर्या विशिष्ट आहार आणि जीवनशैली समायोजनांची शिफारस करून या समस्यांचे निराकरण करतात.

## लातुरात विसर्जन मिरवणुकीवर सीसीटीव्ही कॅमेरे व ड्रोन ची नजर; दोन हजार पोलिस बंदोबस्तावर!



लातूर :- श्री गणरायाला निरोप देण्यासाठी विविध गणेश मंडळांनी विसर्जन मिवणुकीची जय्यत तयारी केली आहे. मंगळवारी निघणाऱ्या विसर्जन मिवणुकीसाठी तब्बल दोन हजार पोलिस अधिकारी, अमलदार तैनात करण्यात आले आहे.

लातूर शहरासह जिल्ह्यात जवळपास १ हजार ३२८ गणेश मंडळांनी यंदा श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली होती. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेला गणेशोत्सवाचा जल्लोष आता अखेरच्या टप्प्यावर आला आहे. मंगळवारी १७ सप्टेंबरला श्री गणरायाच्या मुर्तिचे विसर्जन होणार आहे. दरवर्षीप्रमाणे गणपती बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी लातूर पोलीस प्रशासनही सज्ज आहे . एकूण १ हजार २३८ गणेश मंडळाकडून विसर्जन मिरवणूक काढली जाणार आहे. श्री गणेश विसर्जन मिरवणुक काळात लातूर शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. गैरप्रकार रोखण्यासाठी पोलिस पथके, लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी पोलिस मदत केंद्र, तसेच संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी मिरवणूक मार्गांवर सीसीटीव्ही कॅमऱ्यांची व ड्रोन द्वारे नजर ठेवली जाणार आहे. श्री गणेश मूर्तीचे संकलन करण्यासाठी ठिकाणे निश्चित केली असून, १५ ठिकाणी गणेश मूर्तीचे संकलन होणार आहे.

तगडा पोलिस बंदोबस्त.. लातूर जिल्ह्यामध्ये विसर्जन मिरवणूक काळात १२० पोलीस अधिकारी, १२५० पोलीस अंमलदार, त्यांच्या मदतीला ९५० होमगार्ड, राज्य राखीव दलाच्या तुकड्या, दंगा काबू पथकाचे ४ प्लाटून, तसेच शिघ्रकृती दलाचे २ पथक तैनात करण्यात आले आहेत.

तसेच जिल्हयातील ३२२५ सराईत गुन्हेगारांना प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली असून एकंदरीत यंदाचे गणेश विसर्जन व ईद-ए-मिलाद मिरवणुका शांततेत व निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दल सज्ज आहे.

गणेश मंडळांनी व ईद-ए-मिलाद निमित्त निघणाऱ्या मिरवणुका मध्ये निर्बंधीत डॉल्बी व लेझर बीम चा उपयोग करू नये असे आवाहन लातूर पोलीस दलाकडून करण्यात येत आहे. मिरवणुकीसाठी तैनात असणारे पोलीस अधिकारी-अंमलदार यांचे कडून मिरवणुकीच्या अगोदर आणि मिरवणूक चालू असताना अशा दोन्ही वेळी ध्वनी चाचणी घेण्यात येणार असून त्याबाबत दोषी आढळणारे मंडळाचे पदाधिकारी यांचे विरुद्ध कडक कारवाई करण्यात येणार आहे.

## पहाडी मसाला चहा कधी प्यायला आहात का? वाचा पहाडी चहा बनवण्याची सोपी रेसिपी



जगभरातील अनेकांना चहा हे पेय खूप आवडत. सकाळी उठल्यानंतर सगळ्यात आधी चहा प्यायला जातो. चहा प्यायल्याशिवाय दिवसाची सुरुवातच होत नाही. हल्ली अनेक वेगवेगळ्या प्रकारचा चहा बाजारात उपलब्ध झाला आहे. मसाला चहा, गुळाचा चहा, बासुंदी चहा इत्यादी चहाचे प्रकार आहेत. गुळाचा आणि काळा चहा आरोग्यसाठी गुणकारी आहे. काळ्या चहाचे सेवन केल्यामुळे असिडिटीचा त्रास होत नाही. तसेच चहा बनवताना गरम पाण्यात चहा पावडर, साखर आणि आल्याचा तुकडा टाकला जातो. अशा पद्धतीने चहा बनवल्यानंतर मसाला चहा तयार होतो. पण तुम्ही कधी पहाडी चहा प्यायला आहे का? नसेल प्यायला तर या पद्धतीने पहाडी चहा नक्की बनवून पहा. तुम्ही बनवलेला पहाडी चहा सगळ्यांना खूप आवडेल. चला तर जाणून घेऊया पहाडी चहा बनवण्याची सोपी कृती.

साहित्य: आलं तुळशीची पाने पुदिना लवंग वेलची दूध चहा पावडर गूळ पाणी

कृती: पहाडी चहा बनवण्यासाठी सर्वप्रथम टोपात पाणी घेऊन गरम करण्यासाठी ठेवा. पाण्याला उकळी आल्यानंतर गॅस बारीक करा.

त्यानंतर खलबत्यामध्ये किंवा वाटीत आलं, तुळशीची पाने, पुदिना, लवंग, वेलची हे सर्व पदार्थ बारीक कुटून घ्या.

हे सर्व साहित्य कुटून झाल्यानंतर सुगंधीत मसाला तयार होईल.

उकळी आलेल्या पाण्यात तयार केलेला मसाला टाकून मिक्स करून घ्या. मसाला टाकल्यानंतर चहा चमच्याने सततढवळत राहा.

चहाला व्यवथित उकळी आल्यानंतर त्यात दूध घालून पुन्हा एकदा चहा व्यवस्थित उकळवा.

त्यानंतर गॅस बारीक करून त्यात किसलेलं गूळ टाकून मिक्स करून घ्या.

गॅस बंद करून सर्व्ह करा पहाडी चहा. तुम्ही बनवलेला चहा घरातील सगळ्यांचं खूप आवडेल.

# भ्रष्ट पैशातून मतदार संघ विकत घेण्याचे पाप केले, त्या पापाची परतफेड करण्याची आता वेळ आली

## गावागावातील संवाद कार्यक्रमात आ. रमेशआप्पा कराड यांचे प्रतिपादन

लातूर :- लातूर ग्रामीण मतदार संघाला मी आई मानतो, विकास कामाच्या माध्यमातून या आईची सेवा करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असून गेल्या विधानसभा निवडणुकीत याच आईचा भ्रष्ट पैशातून सौदा केला, मतदार संघाला विकत घेण्याचे पाप केले, केलेल्या या पापाची परतफेड करण्याची आता वेळ आली आहे. येत्या काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जनता धडा शिकवणार हे लक्षात आल्यानेच देशमुखांच्या आख्या कुटुंबाला घराबाहेर पडावे लागत असल्याचे भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात, वाडी वस्तीत जाऊन ग्रामस्थांशी चर्चा करावी, त्यांच्या अडी अडचणी, प्रश्न समजून घ्यावेत, शक्य असलेल्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी यासाठी भाजप नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी सुरू केलेल्या जनसंवाद दौऱ्यात रविवारी रेणापूर तालुक्यातील मौजे आरजखेडा, सांगवी, सिंधगाव, निवाडा आणि शेरा येथे ग्रामस्थांशी संवाद कार्यक्रम झाला. प्रत्येक गावात ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. ठिकठीकाणच्या गावकऱ्यांनी वाजत गाजत फटाके फोडून मोठ्या उत्साहाच्या वातावरणात आ. कराड यांचे जोरदार स्वागत केले. यावेळी महिलांची संख्या लक्षणीय होती. याप्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुका अध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष सतिश अंबेकर, अध्यात्मिक आघाडीचे ज्ञानोबा भिसे, भाजयुमोचे तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, महिला आघाडी तालुकाध्यक्षा अनुसया फड, शिंदे सेनेचे जिल्हा युवाप्रमुख सरपंच कुलदिप सुर्यवंशी, सरपंच सुनिल चेवले, उपसरपंच डॉ. परमेश्वर जाधव, सुनिल सुर्यवंशी, श्रीमंत नागरगोजे, विठ्ठल कस्पटे, शिवमूर्ती ऊरगुंडे, नानासाहेब कसपटे, संगमेश्वर स्वामी, प्रताप भुरे, मधुकर भुरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

सांगवी येथील जिप शाळेच्या ३६ लक्ष रुपये खर्चाच्या चार वर्गखोली बांधकामचा शुभारंभ, सिंधगाव येथे २० लक्ष रुपये खर्चाच्या जगदंबा देवी मंदिर समोर सभामंडप बांधकामचा आणि गावअंतर्गत सिमेंट रस्ता व नाली बांधकामचा शुभारंभ, आरजखेडा येथे अंगणवाडीचे लोकार्पण, निवाडा येथील संगमेश्वर मंदिर परिसरात १७ लक्ष रुपये खर्चाच्या किचनशेड व संरक्षण भिंतीचे उदघाटन, बौध्द विहार वास्तूचे लोकार्पण आणि शेरा येथील दावलमलिक बाबा दर्गाह येथे ५० लक्ष रुपये खर्चाच्या सभागृहाचे लोकार्पण भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आले. निवाडा येथील खंडोबा मंदिर सभागृह करिता १० लक्ष रुपये निधीचे पत्र ग्रामस्थांना सुपूर्त केले. सांगवी येथ आणखी २ शाळा खोल्या व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी मिळवून दिला जाईल, सांगवी गावात येणाऱ्या रस्त्याचा प्रश्न लवकरच निकाली काढला जाईल, बस सेवा तात्काळ सुरू करण्यासाठी योग्य ती कारवाई करावी अशी सूचना परिवहन मंडळाच्या अधिकाऱ्यांना आ. कराड यांनी फोनवरून दिली. गव्हाण आरजखेडा रस्त्याचे काम प्राधान्याने सुरु करण्यात येईल असे आश्वासन दिले.



काँग्रेसला ६५ वर्षात जमले नाही ते गेल्या १० वर्षात मोदीजींनी जे करून दाखवले. गोरगरीब सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून अनेक लोक कल्याणकारी योजना सुरू केल्या. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेची सविस्तर माहिती देवून या योजनेचा लाभ कोणाकोणाला मिळाला असा प्रश्न आ. कराड यांनी उपस्थित केला. काँग्रेसवाल्यांनी जे काही लाभ दिले ते तोंड बघून दिले, मात्र महायुती शासनाने जात, धर्म, पंथ असा कुठलाही भेदभाव न करता जो पात्र लाभार्थी आहे ज्याला गरज आहे अशा गरजवंतांना विविध योजनेचे लाभ मिळत आहेत असे बोलून दाखवले. निवडून गेलेल्या आमदाराला सामान्य जनतेशी काहीही घेणेदेणे नाही. निष्क्रिय माणसाला संधी दिली हेच तुमचे दुर्दैव आहे. विकास कामासाठी निधी आणण्याचा प्रयत्न केला नाही, मात्र मी केलं मी केलं हे माझ्यामुळे झाले असे सांगून श्रेय लाटण्याचा केविलवाणी प्रयत्न सातत्याने केला जात असून काँग्रेस आमदारांनी पंधरा वर्षात काय केले. कुठल्या कामाला निधी दिला असा प्रश्न उपस्थित करून आमदार नसताना मी मतदारसंघातील प्रत्येक गावागावात विकासाला मोठ्या प्रमाणात निधी मिळवून दिला. मला एकदा आमदार करा गावातील एकही विकासाचे काम शिल्लक राहणार नाही असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लाडकी बहीण योजनेचा महिलांना लाभ मिळू नये यासाठी काँग्रेसवाले न्यायालयात गेले, निवडून गेलेल्या आमदाराच्या मातोश्री वहिनीसाहेब आणि सौभाग्यवती लाडकी बहीण ही योजना फसवी आहे पैसे मिळणार नाहीत असे सांगून महिलांची दिशाभूल केली मात्र महिलांच्या खात्यावर पैसे जमा होताच यांचे तोंड बंद झाले. साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्याची अडवणूक आणि पिळवणूक करणे हेच काँग्रेसवाल्याचे धोरण आहे. साखर कारखाने ही देशमुखची जहागिरी नाही तर शेतकरी सभासदाच्या मालकीचे आहेत. मांजराच्या दारात हजारो शेतकऱ्यांना सोबत घेऊन मी आंदोलन केले, म्हणूनच एफआरपीप्रमाणे भाव द्यावा लागला. उसाच्या टिपऱ्याचे राजकारण या पुढील काळात चालू देणार नाही, मांजरा कारखान्याला पाचट कपातीचे प्रकरण अंगलट येणार हे लक्षात आल्यानंतर शेतकऱ्यांना पाचट कपातीचे पैसे देऊन उपकाराची भाषा केली जाते मात्र कपातच कुठल्या नियमात केली हे शेतकऱ्यांना जाहीरपणे सांगावे. मांजरा परिवारातील साखर कारखान्यापेक्षा इतर साखर कारखान्यांनी अधिकचा भाव दिला. राज्यातील महायुती शासन देणारे आहे, या शासनाने अनेकांना आधार देण्याचे काम केले तर मागील महाविकास आघाडीचे शासन हे वसुली करणारे शासन होते या आघाडी सरकारच्या काळात अनेक मंत्री जेलमध्ये गेले. महायुती शासनाच्या लोककल्याणकारी विविध योजनेचा समाजातील सर्वच घटकांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळत आहे या सर्व योजना भविष्यातही सुरू ठेवण्याकरिता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला साथ द्यावी असेही आवाहन यावेळी आ. कराड यांनी केले.

संवाद कार्यक्रमास उपसरपंच भालचंद्र सूर्यवंशी, वाजिद पठाण सूर्यवंशी, राजाभाऊ सूर्यवंशी, दगडू सूर्यवंशी, आत्माराम सूर्यवंशी, हरिश्चंद्र सूर्यवंशी, महादेव सूर्यवंशी, दिलीप जाधव, दगडू सावंत, मेघराज जाधव, जयद्रथ सावंत, गुणवंत जोगदंड, बालाजी सावंत, कैलास सावंत, समाधान सावंत, गोविंद जाधव, अविष्कार मुळे, सोमनाथ जाधव, दत्तात्रय चेवले, विशाल चिलमे, मनोहर कुलकर्णी, बळवंत कुलकर्णी, गोवर्धन चेवले, डॉ.अशोक धोंडे, मदन हरेलकर, हनुमंत कुंभार, लक्ष्मण चेवले, महादाप्पा चिंचकर, सरपंच बेबीसरोजा भुरे, बापू कुलकर्णी, कल्याण भुरे, शेख चांदपाशा, माजी उपसरपंच महादेव कांबळे, अँड शेख सिकंदर, कल्याण भुरे, गुलाब शेख, सरपंच वंदना साळुंखे, उपसरपंच महादेव कोंढुळे, सदाशिव राठोड, संजय पिंपळे, संगमेश्वर जमदरे, गफूर शेख, विजयकुमार उरगुंडे, रसूल शेख, किशोर कारणे, दयानंद लकडे, बाळू गिरी, राम गायकवाड, विलास कस्पटे, मेघराज बडे यांच्यासह गावातील नागरिक, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबरनाथ येथे संविधान मंदिराचे उदघाटन




आंबरनाथ / प्रतिनिधी :- औद्योगिक प्रशिक्षण संस्था आंबरनाथ येथे दिनांक : १५ सप्टेंबर २०२४ रोजी भारताचे उपराष्टपती मा. जगदिप धनखड यांच्या हस्ते राज्यातील ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये स्थापित करण्यांत आलेल्या संविधान मंदिराचे उदघाटन एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय मुंबई ०१ या संस्थेतून ऑनलाईन पध्दतीने करण्यांत आले आहे. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबरनाथ येथे सदर कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मा आमदार डॉ. बालाजी किणीकर, अंबरनाथ विधान सभा मतदार संघ , संस्थेचे प्राचार्य श्री महेश जाधव, आध्यक्ष अंबरनाथ श्री उमेश तायडे, वरीष्ठ पोलिस निरीक्षक श्री कळसकर अंबरनाथ पोलीस स्टेशन, डव्होकेट दिलीप मेहेर आदी मान्यवर तसेच आजी -माजी प्रशिक्षणार्थी व पालक उपस्थित होते. मा आमदार यांनी अत्यंत उत्तमरित्या उपस्थित समुदायाला संविधाना बाबत संबोधित केले आहे. संविधान मंदिराच्या उद्घाटनानिमित्त दिनांक १२ ते १४ सप्टेबर रोजी संस्थेतील प्रशिक्षार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेण्यांत आल्या होत्या. सदर स्पर्धे तील गुणवंत प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशिस्तीपत्रे वितरीत करण्यांत आली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील गटनिदेशक श्री जे एस भामरे, श्री व्ही एल, पाटील, व संस्थेतील सर्व कर्मचारी यांनी अंत्यत चांगल्या प्रकारे योगदान दिले आहे व सदर कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री बी बी संदानशिव यांनी केले

## जनसेवा रिक्षा चालक मालक संघटनेच्या व जनसेवा चैरिटेबल ट्रस्टच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त मोफत आरोग्य शिबिर संपन्न



नवी मुंबई / के. एच. हनवते : ( नेरुळ ) जनसेवा रिक्षा चालक-मालक संघटना आणि जनसेवा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, या शिबिरात सुमारे २०० लोकांवर थायरॉईड, नाक, कान, घसा, डोळ्यांच्या आजारांवर उपचार करण्यात आले. डी वाय पाटील यांच्या डॉक्टरांनी मोफत तपासणी केली. यावेळी जनसेवा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ३७ वा गणेशोत्सव आयोजित केला जात असून, त्याचे संस्थापक अध्यक्ष माजी काँग्रेस येथील संतोष शेट्टी आहेत. यावेळी प्रामुख्याने उपस्थित माजी नगरसेवक संतोष शेट्टी, माजी नगरसेविका अनिता संतोष शेट्टी, मंडल चे अध्यक्ष मुकेश शर्मा, डी, वाय पाटील यांच्या वैदिकीय समाजसेविका स्वाती लगडे, जनसंपर्क अधिकारी नितीन यशवंते, जनसेवा रिक्षाचालक - मालकचे संस्थापक अध्यक्ष आसिफ शब्बीर शेख, उपाध्यक्ष मनोज गायकवाड, सचिव डॉ. प्रकाश सदावार, प्रमुख सल्लागार प्रकाश बंडगर, सल्लागार राहुल शिर्के यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# पाच दिवसीय धम्म संस्कार प्रशिक्षण शिबिरास सुरुवात

**पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली वैशाली बुद्ध विहार बौध्द नगर लातूर येथे प्रारंभ.**



लातूर :- भगवान बुद्धाने मानवतेची सदाचरणाची शिकवण संपूर्ण जगाला दिली.सर्वच बौद्ध राष्ट्रांनी बौद्ध संस्कृती पारंपारिक पणे आपल्या देशात हजारो वर्षांपासून रुजवली आहे. धम्माचे गांभीर्य महत्व वृद्धी आणि जतन व जोपासना प्रांजळ व स्वाभिमानाने जागतिक बौद्ध करताना दिसून येतात. प्रत्येक बौद्ध देशांची बुद्ध वंदना पूजापाठ वेशभूषा उपोसथ कम्म ध्यान विपश्यना धम्म अभ्यास आणि ज्ञान यामध्ये एक वाक्यता व साम्यता आहे. बुद्धाचा विचार हा भारतात आणि जगात प्रसारित झाला आहे.बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या आधुनिक काळात महामानव बुद्धांचा विचार राजा सम्राट अशोकाचे अनुकरण करीत लयास गेलेल्या बौद्ध संस्कृतीचे बीजारोपण सन १९५६ साली नागपूरला केले. तेव्हा समाजात धम्माबद्दल अभ्यास ध्यान विपश्यना वंदना पूजापाठ सूत्रपटन, धम्माचरण या सर्वांमध्ये मोठा फरक दिसून येतो. धम्म जागृती व त्याद्वारे प्रत्यक्ष धम्माचा प्रसार, खरे आचरणशील बौद्ध बनविण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न लातूर शहरात संस्कार शिबिर आयोजित करूण पु.भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १४ सप्टेंबर पासून ते १८ सप्टेंबर २०२४ पर्यंत पाच दिवसांकरिता धम्म प्रशिक्षण दिले जाणार आहे. दररोज सकाळी आठ ते सायंकाळी साढे सहा वाजेपर्यंत धम्मप्रशिक्षण आणि भिक्खू - भिक्खुणी आणि बौद्ध विद्वानांद्वारे सतत वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. शिबिराच्या सुरुवातीस महामानवांच्या प्रतिमेचे पुष्पाने धूपाने तथा दीपाने पुजन करण्यात आले. त्रिरत्न वंदने नंतर शिबिराचि सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी केशव कांबळे, उदय सोनवणे असितकुमार कांबळे, अनिरुद्ध बनसोडे, करण ओहळ, सचिन सुरवसे, मिलिंद धावारे, भरत कांबळे आदींनी प्रयत्न केले.

# आरोग्यसेवक पदाची निवड गुणवत्ता यादीनुसार करण्याची विद्यार्थ्यांची मागणी

## जिल्हा परिषद प्रशासनाच्या मनमानी कारभाराचा फटका बसतोय गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या भविष्याला

लातूर : जिल्हा परिषदेअंतर्गत भरती केल्या जाणाऱ्या आरोग्य सेवक (५० टक्के) पदाची निवड गुणवत्ता यादीनुसार करण्यात यावी अशी मागणी विद्यार्थ्यांतून केली जात आहे. ही भरती प्रक्रिया शासनाच्या जाहिरातीतील नमूद दि. ४ मे २०२२ तसेच दि. १५ मे २०२३ च्या परिपत्रकाप्रमाणे करण्याची मागणीही गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनी एका प्रसिद्धिपत्रकान्वये केली आहे. राज्यात जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्यसेवक पद ( ५० टक्के ) या पदासाठी आयबीपीएस मार्फत परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला असून विद्यार्थ्यांना कागदपत्र पडताळणीसाठी बोलावण्याची प्रक्रिया चालू आहे. यामध्ये या पद भरतीच्या यापूर्वी काढण्यात आलेल्या जाहिरातीत कुठेही उल्लेख नसलेल्या दि. ५ एप्रिल २००३ च्या सेवा प्रवेश नियमाचा वापर करून विद्यार्थ्यांना कागदपत्र पडताळणीसाठी बोलावण्यात येत आहे. ही बाब अत्यंत चुकीची असून त्यामुळे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांवर अन्याय होऊन ते या सेवेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हीच बाब गुणवत्ताधारक विद्यार्थी वेगवेगळ्या मार्गाने प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, दुर्दैवाने प्रशासन या विद्यार्थ्यांच्या न्याय मागणीकडे हेतुतः डोळेझाक करताना दिसत आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे अनेक गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधकारमय होण्याची भीती निर्माण झाली आहे. गुणवत्ताधारक विद्यार्थी नियमाप्रमाणे या पदांची भरती करण्यात यावी अशी अपेक्षा बाळगून आहेत. तसेच जाहिरातीतील नमूद ' प्राधान्य' शब्दाच्या चुकीच्या अर्थामुळे प्रशासनात गोंधळ उडाला असून प्रशासनाच्या या गोंधळाची शिक्षा गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना सहन करण्याची वेळ येते की काय ? असे दिसून येत आहे. स्पर्धा परीक्षेत प्राधान्य शब्दाचा अर्थ असा आहे की, अन्य बाबी गुणात्मक आणि संख्यात्मकदृष्ट्या समान असतील तर अतिरिक्त पात्रता असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाचे मत आहे. सर्वोच्च न्यायालयानेही स्पष्ट केले आहे की, नियुक्त्यांमध्ये अनुसरण करण्यात येणारे प्राधान्याचे नियम आरक्षणाचे नाहीत आणि याचा अर्थ फक्त असा आहे की,गुणवत्ता आधारित दोन उमेदवारांमध्ये सर्व गोष्टी समान असतील, तर उच्च पात्रता असलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल. मात्र ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाकडेच जिल्हा परिषद प्रशासन डोळेझाक करत असल्याचे दिसत आहे. जिल्हा परिषद प्रशासन जर या निकषाप्रमाणे काम करणार नसेल तर गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनी प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# भविष्यातही महिला सक्षमीकरणात भरीव योगदान देण्याकरीता आमदार धिरज देशमुख यांना आशिर्वाद द्यावा चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख

> पुन्हा एकदा संधी द्या, विश्वासाने विकास करुन घ्या रीड लातूरच्या संस्थापिका सौ.दीपशिखा धिरज देशमुख महिलांशी संवाद साधताना म्हणाल्या, आमदार धिरज देशमुख यांनी गेल्या पाच वर्षांत प्रामाणिकपणे मतदारसंघाचा विकास केला.मतदारसंघातील मतदारांनी पुन्हा एकदा आमदार धिरज देशमुख यांना संधी देऊन विश्वासाने विकास कामे करुन घ्यावीत, असे आवाहन केले. तसेच आपल्या सर्वांशी देशमुख परीवाराचे नाते आपुलकीचे प्रेमाचे असून ते नाते अधिक घटट करण्यासाठी आम्ही सुसंवाद साधत आहोत असे त्यांनी सांगीतले.

लातूर / प्रतिनिधी :- महिलांना सक्षमीकरण करायचे असेल तर त्यांच्या आर्थिक उन्नतीचास्तर उंचावण्यासाठी भरीव निधिची तरतूत करणे गरजेचे आहे. या महीलांच्या सक्षमीकरणासाठी सुमारे दहा कोटी रुपयांचे तरतूद लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन म्हणून केली, त्याचा प्रत्यक्ष लाभ महिलांना मिळत आहे. भविष्यातही महिला सक्षमीकरणात भरीव योगदान देण्याकरीता आमदार धिरज देशमुख यांना आशिर्वाद द्यावा, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले. लातूर तालुक्यातील भोईसमुद्रगा, नागझरी येथे दि. १६ संप्टेंबर रोजी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांना संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या अध्यक्षा सौ. दीपशिखा धीरज देशमुख, सुनिता अरळीकर, विकास कारखान्याचे माजी संचालक गोविंदराव बोराडे, अनंत बारबोले यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या, मागील ४० वर्षापासून तूम्ही सर्वांनी विलासराव देशमुख साहेबांचे काम पाहिले आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून माजी मंत्री आमदार अमित देशमुख व आमदार धीरज देशमुख लातूर जिल्ह्यासह ग्रामीणचा सर्वांगिण विकास करीत आहेत. गोर-गरीब, शेतकरी, कष्टकरी नागरीकांच्या अडी-अडची सोडवण्यासाठी तत्पर आहोत.भाजप सरकारने गेल्या दहा वर्षात अनेक खोटी आश्वासने आपल्याला दिले आहेत. मतदारांची दिशाभूल करीत सत्ता मिळवणे, हाच एकमेव त्यांचा उद्देश आहे. येणाजया विधानसभेच्या निवडणुकीतही भाजपा आणि सत्ताधारी दिशाभूल करण्याची शक्यता आहे. त्यामुळे यांच्या खोट्या, फसव्या आणि दिशाभूल करणाजया जाहिरातींना बळी पडू नका, असे आवाहन केले. याप्रसंगी नागझरी येथील महिला तेजा पवार, शोभा पवार, वैशाली साळूंके, नाजीमा शेख, ज्योती रणदिवे, सुरेखा हारगावकर, संगिता सुर्यवंशी, ज्ञानेश्वर पवार, नरेश पवार, सुदाम साळुंके, काशीनाथ स्वामी, बजरंग बनसोडे, गफार पटेल, नरेश पवार, दत्ता पवार, रामदास घोडके, अनिल दरकसे, हणमंत ढमाले, श्रीराम साळूंके आदीसह महिला व पुरुष मंडळी उपस्थित होती. तर भोईसमुद्रगा येथील लक्ष्मीताई रोंगे, मंगल वाघमारे, गुंडाबाई पांचाळ, राहूल रोंगे, नानासाहेब रोंगे, कल्याण देशमुख, विकास देशमुख, दत्ता चोथवे, लक्ष्मण वाघमार आदी महिलासह पुरुष मंडळी उपस्थित होती.




PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE